**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेच्या निकषात सुधारणा करणे.**

**महाराष्ट्र शासन**

**सहकार विभाग,**

**शासन पुरकपत्र क्र. कृकमा.०५२६/प्र.क्र.९३/का.२-स**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०००३२

दिनांक : १५ जुलै, २०२६

**संदर्भ:-** शासन निर्णय क्र.कृकमा.०५२६/प्र.क्र.९३/का.२-स, दि. ०२.०६.२०२६

**प्रस्तावना:-**

नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय दि. ०२.०६.२०२६ अन्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ जाहिर करण्यात आली आहे.

दरम्यान महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२६ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दि.१०.०७.२०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेच्या निकषामध्ये अंशत: बदल करण्याबाबत घोषणा केली आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय यांनी केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने योजनेच्या निकषात सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव दि. १४.०७.२०२६ रोजी झालेल्या मा. मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाबाबत मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार दि. ०२.०६.२०२६ रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन पुरकपत्र :-**

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेल्या पार्श्वभुमीवर दि. १४.०७.२०२६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेच्या दि. ०२.०६.२०२६ च्या शासन निर्णयातील निकषमांध्ये अंशत: बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे-

१. शासन निर्णय दि. ०२.०६.२०२६ मधील (I) **योजनेचा तपशिल** या भागातील **अ) कर्जमुक्ती** मथळयाखालील परिच्छेद (iii) ऐवजी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

ज्या शेतकऱ्यांना यापुर्वी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ या योजनेचा लाभ मिळाला आहे अशा शेतकऱ्यांनी दि. ०१.०४.२०१९ ते दि. ३१.०३.२०२५ पर्यंत

उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्ज व पिक कर्जाचे केलेले पुनर्गठन / फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांची दि. ३०.०९.२०२५ अखेर थकीत असलेली व दि. ३१.०३.२०२६ अखेर परतफेड न झालेली एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यातील एकत्रित थकबाकीची मुद्दल व व्याजासह एकूण रक्कम रू. २.० लाख पर्यंत असल्यास त्यांना या योजने अंतर्गत रू. २.० लाख अधिकतम मर्यादेपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येईल.

२. शासन निर्णय दि. ०२.०६.२०२६ मधील योजनेचा तपशिल या भागातील **ब) एकवेळ समझोता** (OTS) या मथळयाखालील परिच्छेद (ii) वगळण्यात येत आहे.

३. शासन निर्णय दि. ०२.०६.२०२६ मधील योजनेचा तपशिल या भागातील **क) प्रोत्साहनपर लाभ** या मथळयाखालील परिच्छेद क्र. (i) मधील सन २०२६-२७ हे वर्ष वगळण्यात येत आहे.

सदर शासन पुरकपत्र मा. मंत्रिमंडळाने दिनांक १४.०७.२०२६ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत दिलेली मान्यता तसेच वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४६१/२०२६/व्यय-२, दिनांक १५.०७.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०७१५१९०३४१४८४७ असा आहे. हे शासन पुरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by PRAVIN CHINDHU DARADE
Date: 2026.07.15 19:05:05 +05'30'

**(प्रवीण दराडे)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री (रा.ऊ.शु.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
५. मा. विधानसभा सदस्य / मा. विधानपरिषद सदस्य (सर्व)
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
७. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव
८. मा. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मा. सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. मा. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. मा. सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दीमत्ता, मंत्रालय, मुंबई

१२. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
१३. मुख्य महाप्रबंधक, भारतीय रिझर्व्ह बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई
१४.मुख्य महाप्रबंधक, नाबार्ड प्रादेशिक कार्यालय, पुणे
१५. चेअरमन, राज्यस्तरीय बँकर्स समिती, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे.
१६. विभागीय आयुक्त, (सर्व)
१७.जिल्हाधिकारी (सर्व)
१८. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
१९. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२०.जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.,मुंबई
२२.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., (सर्व)
२३.निवड नस्ती